# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,दिनांक १५ जून,२०२२

## अधिसूचना क्रमांक -१

## [(संदर्भ कलम ११(१)]

धरण सुरक्षा कायदा,२०२१

क्रमांक संकीर्ण-२००/प्र.क्र.४९/२०२२) /सिंव्य कामे- धरण सुरक्षा कायदा -२०२१ (क्र.४१ सन २०२१) प्रकरण ४ मधील कलम ११ (१) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्यातील धरणांसाठी पुढील प्रमाणे राज्य धरण सुरक्षितता समिती दि.१५ जून,२०२२ या तारखेपासून स्थापित करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| ११. (१) (अ) | सचिव (लाभ क्षेत्र विकास),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई, महाराष्ट्र | पदसिद्ध अध्यक्ष |
| ११. (१) (ब) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे, महाराष्ट्र | सदस्य |
| ११. (१) (ब) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपुर, महाराष्ट्र | सदस्य |
| ११. (१) (ब) | मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभ क्षेत्र विकास, औरंगाबाद, महाराष्ट्र | सदस्य |
| ११. (१) (ब) | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव, महाराष्ट्र | सदस्य |
| ११. (१) (ब) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई, महाराष्ट्र | सदस्य |
| ११. (१) (ब) | मुख्य अभियंता,मृद व जलसंधारण विभाग,पुणे, महाराष्ट्र | सदस्य |
| ११. (१) (क) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, मध्यप्रदेश | सदस्य |
| ११. (१) (ड) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, गुजरात | सदस्य |
| ११. (१) (ड) | मुख्य अभियंता,कर्नाटक निरावरी निगम लिमिटेड, इरिगेशन (नॉर्थ), जलसंपदा विभाग, बेळगावी,कर्नाटक | सदस्य |
| ११. (१) (ड) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, तेलंगणा | सदस्य |
| ११. (१) (ड) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, गोवा | सदस्य |
| ११. (१) (ई) | संचालक,बीसीडी (इ आणि एन इ), केंद्रिय जल आयोग, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली | सदस्य |
| ११.(१) (फ) | प्राध्यापक,जलशास्त्र विभाग, आय आय टी. रुरकी, उत्तराखंड | सदस्य |
| ११.(१) (फ) | शास्त्रज्ञ-ग तथा प्रमुख ,सरफेस वॉटर हाड्रोलॉजी डिव्हिजन,नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ हाड्रोलॉजी, रुरकी, उत्तराखंड | सदस्य |
| ११.(१) (फ) | प्राध्यापक,स्थापत्य विभाग,आयआयटी बॉम्बे ,पवई, मुंबई | सदस्य |
| ११.(१) (ग) | मुख्य अभियंता,जल प्रकल्प मूल्यांकन विभाग, केंद्रिय विद्युत प्राधिकरण, विद्युत मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली | सदस्य |
| १२.(२) | मुख्य अभियंता ,जलविज्ञान व धरण सुरक्षितता, जलसंपदा विभाग नाशिक, महाराष्ट्र | सदस्य सचिव |

१) धरण दुर्घटनेमुळे होणारी आपत्ती टाळण्याकरीता राष्ट्रीय धरण सुरक्षितता प्राधिकरणाने प्रसृत केलेल्या मार्गदर्शक तत्वे ,मानके व इतर निर्देशांनुसार धरण सुरक्षा कायदा - २०२१ मधील परिशिष्ट ३ अन्वये निर्धारीत जबाबदारी राज्य धरण सुरक्षितता समिती पार पाडेल.

२) राज्य धरण सुरक्षितता समिती आवश्यकतेनुसार उप समित्या स्थापन करुन कामाकाजात त्यांचे सहाय्य घेऊ शकेल. या समितीस व उपसमित्यांना लागणारे सचिवीय सहाय्य (Secretarial Assistance) राज्य धरण सुरक्षितता संघटना यांचेमार्फत पुरविण्यात येईल.

३) राज्य धरण सुरक्षितता समिती आवश्यकतेनुसार कोणत्याही निर्दिष्ट धरणाच्या मालकाच्या प्रतिनिधीस तसेच इतर कोणत्याही धरण सुरक्षा तज्ञास कामकाजात त्यांचे सहाय्य घेण्याकरीता निमंत्रित करुन शकेल.

४) राज्य शासनास अभिप्रेत असलेल्या बैठकींच्या नियमानुरुप अपेक्षित स्थळी व वेळी , राज्य धरण सुरक्षितता समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका आयोजित करण्यात येतील, ज्यापैकी एक बैठक ही पावसाळा सुरु होण्याआधी आयोजित करण्यात येईल.

५) राज्य धरण सुरक्षितता समितीची उपरोक्त तक्त्यात नमूद रचना या अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन वर्ष कालावधीकरीता कार्यरत राहील, व तद्नंतर सदर समितीचे दर तीन वर्षांनी पुनर्गठन करण्यात येईल.

६) सदर समितीच्या बैठकांकरिता होणारा खर्च हा राज्य शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

७) सदर समितीच्या किंवा उपसमित्यांच्या बैठकांना उपस्थित राहणारे विशिष्ट सदस्य व इतर तज्ञ निमंत्रितांना राज्य शासनाने विहित केलेले शुल्क व भत्ते अदा करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(किरण कुलकर्णी)
सचिव (लाभ क्षेत्र विकास)
(जलसंपदा विभाग)